दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र


मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 27 मार्च 2026 | अंक क्र. 307 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4


Website : atulyamaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com









# ना.पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत परळीत श्रीराम जन्मोत्सव सोहळा

### प्राचीन काळाराम, सावळाराम मंदिरात घेतले दर्शन ; परळीत रामराज्यासाठी दिल्या शुभेच्छा

### महिला, पुरुषांची लक्षणीय उपस्थिती ; टाळ, मृदगांच्या निनादाने वातावरण भक्तीमय







**परळी | प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील धार्मिक महत्त्व असलेल्या ऐतिहासिक काळाराम व सावळाराम मंदिरात आज श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा झाला. 'जय श्रीराम, जय जय श्रीराम' चा जयघोष करत परळीत रामराज्य व्हावे अशा शब्दांत त्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या.

अंबेवेस भागातील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या काळाराम मंदिरात आज दुपारी १२ वा. श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहात पार पडला. यावेळी महिला व पुरूषांची उपस्थिती लक्षणीय होती. ना.पंकजाताई मुंडे यांनी उत्सवात सहभाग घेतला. श्री राम जन्माच्या वेळी पाळण्याची दोरी त्यांच्या हाती देण्यात आली. भाविक महिलांसोबत त्यांनी पाळणाही म्हटला. टाळ, मृदंगाचा गजर आणि संगीताच्या निनादाने वातावरण भारावून गेले होते. आरतीनंतर पंकजाताईंनी श्रीरामाचे मनोभावे दर्शन घेतले. गणेशपार भागातील सावळाराम मंदिरासही त्यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

यावेळी नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, भाजपचे ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, जुगलकिशोर लोहिया, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, डॉ. शालिनीताई कराड, ॲड शुभांगी गिते, नगरसेवक पवन मुंडे, निळकंठ चाटे,महादेव इटके, प्रीतेश तोतला,अरूण पाठक, आश्विन मोगरकर आदींसह असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

नेकनूर येथे कालिका देवीचे घेतले दर्शन

बीड कडे जाताना नेकनूर येथे ना. पंकजाताईंनी जागृत देवस्थान कालिका देवीचे दर्शन घेतले. वै. प्रात:स्मरणीय गुरु बंकटस्वामी महाराज यांचे शिष्य वै.ह.भ.प सुदामराव महाराज यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यासही त्यांनी भेट दिली. याप्रसंगी प्रभू श्रीराम यांचे दर्शन घेतले. याप्रसंगी उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

# प्रभाग 14 मधील स्नेहनगर सोसायटी ते स्वाभिमान नगर पाणी प्रश्न सुटणार

### सभापती प्रा. पवन मुंडे, सौ. जयश्रीताई गित्ते, डॉ. पूजा तोतला यांच्या प्रयत्नातून नविन पाईपलाईन

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

येथील प्रभाग क्रमांक 14 मधील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला पाणीप्रश्न आता पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गी लागला आहे. बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते, नगरसेविका डॉ. पुजा तोतला यांच्या प्रयत्नातून या भागात नविन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत या कामाचा आज दिनांक 26 मार्च रोजी शुभारंभ करण्यात आला.

स्नेहनगर सोसायटी ते स्वाभिमान नगर पाणी प्रश्न हा मागील 25 वर्षापासून वेगवेगळ्या कारणांमुळे प्रलंबित होता. या भागाचे नगरसेवक तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे आणि पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रविंद्र (पापा) गित्ते यांनी ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गी लावला आहे. या भागासाठी स्वतंत्र पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. यामुळे या भागातील नागरिकांना आगामी काळात मुबलक प्रमाणात पाणी मिळणार आहे. यामुळे भागातील नागरकांनी समाधान व्यक्त केले आहे.



### कामाचा झाला शुभारंभ -

स्नेहनगर सोसायटी ते स्वाभिमान नगर या भागासाठी स्वतंत्र पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. या कामाचे नारळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, सौ. जयश्रीताई गित्ते, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, रवींद्र (पापा) गित्ते, युवक नेते निळकंठ चाटे, नगरसेवक प्रितेश तोतला, प्रल्हाद सुरवसे, सतिश मानधने, सुरज सावजी, अजय पोपळघट, गौरव व्यास, संतोष मोरे, गजानन माने, पवन जाधव, बालाजी कांदे यांच्या समवेत परिसरातील नागरीक व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# अंबाजोगाईत एसआरटी रुग्णालयात सुरक्षा रक्षकांकडून मारहाण; ॲड. इस्माईल गवळी व ऑटोचालक जखमी

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

शहरातील एसआरटी रुग्णालयात महाराष्ट्र सुरक्षा रक्षक बलाच्या कर्मचाऱ्यांकडून ॲड. इस्माईल गवळी तसेच एका ऑटोचालकास बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे रुग्णालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, किरकोळ वादातून हा प्रकार घडला. वाद वाढत गेल्यानंतर सुरक्षा रक्षकांनी दोघांनाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात येत आहे. या घटनेत ॲड. इस्माईल गवळी व संबंधित ऑटोचालक जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच



स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणी संबंधित सुरक्षा रक्षकांवर कारवाईची मागणी होत आहे.

दरम्यान, रुग्णालय परिसरात अशा प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या निधीतून प्रभाग 10 मधील हनुमान मंदिरात होणार सभागृह

### बाजीराव धर्माधिकारी, निळकंठ चाटे, लक्ष्मण मुरकुटे, भिमराव डावरे, प्रविण बीडगर आदींच्या उपस्थितीत झाले भूमिपूजन

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**


राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आमदार निधीतून प्रभाग क्रमांक 10 मधील शिवाजीनगर येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरामध्ये सभागृह होणार आहे. या कामाचे भूमिपूजन आज माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, युवकनेते निळकंठ चाटे, नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, भीमराव डावरे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या आमदार निधीतून शिवाजीनगर येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या सभागृहासाठी 10 लक्ष रुपयाचा निधी दिला आहे. शिवाजीनगर मधील हे हनुमान मंदिर अतिशय पौराणिक आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. या मंदिराच्या जीर्णोद्धारास सुरुवात करण्यात आली असून सभागृहासाठी उपलब्ध करून दिलेल्या कामाचा आज श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात आला. माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, युवक नेते निळकंठ चाटे,व बांधकाम सभापती मा पवन सर मुंडे प्रभाग क्रमांक 10 चे नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, भीमराव डावरे, नगरसेवक प्रितेश तोतला यांच्यासह माजी उपनगराध्यक्ष रविंद्र परदेशी, जेष्ठ नेते सतीश जगताप, युवक नेते प्रविण बिडगर, प्रल्हाद सुरवसे आदींच्या हस्ते विधिवत पूजा करून आणि श्रीफळ वाढवून सभामंडपाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी प्रभागातील विनायक चाटे, रघुनाथ डोळस, जगन्नाथ राठोड, सदाशिव घुगे, वाल्मीक फड, विकास रुपनर, राजू बुंदुले, सचिन कांबळे, उद्धव फड, ज्ञानोबा सानप, अच्युत मुरकुटे, अजित मुरकुटे, संग्राम केंद्रे, मदन पवार, भैय्या कांबळे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभागातील नाली, रस्ता, पाणी यासह अत्यावश्यक सर्व सुविधा पुरवण्याची आम्ही जबाबदारी घेतली असून नागरिकांना तक्रार करण्याची संधी देणार नाही अशी ग्वाही यावेळी तिन्ही नगरसेवकांनी दिली.



# शिलाँग



भारताच्या पूर्वोत्तर राज्यामधील मेघालयची राजधानी असलेले शिलाँग हे ठिकाण देश विदेशातील पर्यटकांना पर्यटनाचा मनमुराद आनंद मिळवून देण्यासाठी प्रसिद्ध आहे. भारतीय संस्कृतीचे वेगळे दर्शन आणि भौगोलिक विविधता यांचे सुंदर दर्शन येथे घडते. बारमाही वाहणारे झरे, धबधबे, चोहोबाजूंना असलेली हिरवाई, दर्या, डोंगर आणि नाना प्रकारच्या जातींचे महाकाय वृक्ष, या वृक्षांच्या फांद्या आणि मुळांपासून बनविले गेलेले सुंदर पूल अशी भरपेट मेजवानी पर्यटकांना भुरळ घालत असते.

मेघालय याचा अर्थच आहे मेघांचे निवासस्थान. या भागात पाऊस खूप पडतो. शिलाँगवर ब्रिटीश वास्तू आणि खाद्यपेयांचा दाट पगडा आहे. पाहण्यासारखी अनेक सुंदर ठिकाणे असलेले या राज्यात प्रामुख्याने आदिवासी जमातींची वस्ती आहे. हत्तीचा भास होणारा आणि तीन टप्प्यात पाणी कोसळणारा हाथी झरना हे येथल्या आकर्षणातले मुख्य आकर्षण म्हटले पाहिजे. पाहाल तेथे निसर्गसौंदर्याची रेलचेल असलेले शिलाँग नितांतसुंदर पण छोटेसे शहर आहे. येथून 8 किमीवर असलेला एलिफंटा फॉल पाहायलाच हवा. चेरापुंजी हे सर्वाधिक पावसाचे ठिकाण येथून 56 किमीवर आहे. सततच्या पावसामुळे दाट झाडी आणि अतिविशाल वृक्षांची येथे दाटीच असून त्यातील काही वृक्ष केवळ याच भागात आढळतात. या भागात या अतिविशाल वृक्षांची मुळे आणि फांद्या बांधून मोठमोठे पूल तयार केले गेले असून ते अतिशय मजबूत आहेत. एकावेळी 50 लोक या पुलांवरून सहज जाऊ शकतात.



डॉन बास्को सेंटर हे सांस्कृतिक संग्रहालय, शिलाँग पीक हा 1966 मीटर उंचीचा भाग, घोड्याच्या नालाचा आकार असलेले मानवनिर्मित वार्डस सरोवर, बोटॅनिकल गार्डन, स्प्रेड इगल फॉल हा रूंद धबधबा आणि अ्रनोखे व प्रेक्षणीय असे बटरफ्लाय संग्रहालय ही येथील आणखी काही आकर्षणे. हे संग्रहालय फुलपाखरांना समर्पित आहे.

## कसे जाल ?

शिलाँगला जाण्यासाठी गुवाहाटीपासून विमान, बस, टॅक्सी अशा सेवा उपलब्ध आहेत. मार्च- एप्रिल आणि आक्टोबर नोव्हेंबर हा काळ येथे भेट देण्यासाठी चांगला काळ आहे

# भरतपूर अभयारण्य



राजस्थानातील केवलादेव या नावाने ओळखले जात असलेल्या या जंगलाचे नामकरण आता भरतपूर असे केले गेले आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेले हे अभयारण्य हजारो जातींच्या स्थलांतरित पक्षांसाठी प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध ब्रिटीश पक्षीतज्ज्ञ सर पीटर स्कॉट यांनी या अभयारण्याचे वर्णन जगातील सर्वात सुंदर पक्षी ठिकाण असे केले आहे. हे जंगल 250 वर्षापासूनचे असून जंगलात असलेल्या शिवमंदिरावरून त्याला केवलादेव असे नाव पडले होते. हे शंकराचे एक नाव आहे. 10 मार्च 1982 या दिवशी त्याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा दिला गेला व 1985 साली ते जागतिक वारसा यादीत समाविष्ट केले गेले.

## पक्ष्यांचा स्वर्ग

नेहमी आढळणाऱ्या पक्ष्यांबरोबरच येथे बदके, ग्रेट स्पॉटेड इगल्स ( गरूड ), इस्टर्न इंपिरियल ईगल्स, आढळतात तसेच नामशेष होऊ घातलेले सायबेरियन क्रेन यांचे हे ब्रिडींग ठिकाण आहे. त्याबरोबरच पेलिगन, रेड काईट, गिधाडे, मार्बल्ड टील, बैकल टील या पक्ष्यांचा हा स्वर्ग म्हणून ओळखला जातो. सस्तन प्राण्यांत लांडगे, तरस, नीलगाई, ठिपक्यांची हरणे आढळतात.



या जंगलाच पक्षी इतक्या प्रचंड संख्येने आहेत की 1938 साली तत्कालिन गव्हर्नर जनरल लॉर्ड लिंडिग्लो यांनी एकाच शिकारीत 4273 पक्षी मारले होते अशी कथा सांगतात. अभयारण्य घोषित होण्यापूर्वी हे जंगल भरतपूर च्या महाराजांचे शिकारस्थळ म्हणून ओळखले जात होते. या पक्षीजंगलाचे मुख्य आकर्षण आहेत सारस पक्षी. अभयारण्याची वेळ सूर्योदय ते सूर्यास्त अशी असली तरी पक्षी पाहायचे असतील तर अगदी पहाटेच म्हणजे सूर्योदयापूर्वीच येथे पाहोचायला हवे.

## जाण्यासाठी मार्ग

येथे जाण्यासाठी जवळचा विमानतळ जयपूर आणि दिल्ली आहेत. रेल्वेने भरतपूर स्टेशनला उतरता येते. हिवाळा येथील चांगला हंगाम. नोव्हेंबर ते मार्च या काळात येथे स्थलांतरीत पक्षी खूप मोठ्या संख्येने येतात.



# सांस्कृतिक खजिन्याचे कच्छ

देशामध्ये मोठ्या प्रमाणात पारंपरिक पर्यटन स्थळे आहेत. मात्र कच्छ हे आपल्या वेगळेपणामुळे आणि सौंदर्यामुळे तग धरून उभा आहे. हा देशातील सर्वात मोठा जिल्हा असल्याने एक भौगोलिक आश्चर्य तर आहेच पण येथे सांस्कृतिक खजिना दडलेला आहे. यामुळे पर्यटकांनी कोणताही विचार न करता याचा प्रवास सुरू करून सुंदर आठवणी घेऊन जावे.

## कच्छचे रण

कच्छचे रण वास्तव्यासाठी योग्य ठिकाण नसले तरीही पर्यटकांनी या ठिकाणाला नक्की भेट द्यावी. येथील क्षारयुक्त जमिनीवर जेथे दृष्टी जाईल तेथे दूरपर्यंत मैलोन मैल पांढरी रेती पसरलेली बघायला मिळते. तुम्ही त्याचे ते रुप डोळ्यात आणि कॅमेऱ्यात साठवून ठेवू शकता. तसेच दिवसा सूर्याच्या किरणांमध्ये न्हाऊन निघालेले लुकलुकणारे रेतीचे कण अनुभवता येतात आणि तर रात्री चंद्राचे आगमन झाल्यानंतर निळसर प्रकाशामध्ये न्हाऊन निघालेला हा प्रदेश थेट चित्रातून बाहेर उतरल्यासारखा भासतो.

## भूजमधील सहल

भूज कच्छची राजधानी आहे आणि हे शहर 16 व्या शतकातील एक संस्थानही होते. येथील विखुरलेल्या वैभवशाली आणि उत्तमरित्या जतन केलेल्या राजवाड्यांच्या स्वरुपातील या शहराचा राजेशाही थाट अजूनही पाहता येतो. यामध्ये सर्वोत्तम कल्पना म्हणून ताज महाल, आईना महल यांचा समावेश आहे.

## मांडवीमध्ये पक्षी निरीक्षण

मांडवी भारतातील जुन्या बंदरापैकी एक आहे आणि आज येथे अनेक पक्षी निरीक्षक मोठ्या प्रमाणात येतात. अक्षरशः वेड्यासारखे येथील अगणित प्रकारच्या पक्ष्यांचे सौंदर्य अनुभवतात. येथे पेलिकन्स, फ्लेमिंगो आणि अनोख्या प्रकारची बदके या सारख्या असंख्य पक्षांच्या प्रजातींचे थवे कोणत्याही पाणीसाठ्याजवळ आढळतात. मग ते तळे असो, दलदलीचा प्रदेश असो किंवा वाहणारे पाणी असो.



## कशी भेट द्याल ?

भूजमध्ये रेल्वे स्टेशन आणि विमानतळ आहे. तुम्ही मुंबई, अहमदाबाद, राजकोट, भावनगर या ठिकाणांपासून भूजसाठी बसेस घेऊ शकता.

# सैफ उल मलूक

# पाकचे सुंदर सरोवर

पाकिस्तान म्हटले की शत्रू राष्ट्र असा भारतीयांचा समज होतो तसेच जगभरातील देशात पाकिस्तानची ओळख दहशतवादाला खतपाणी घालणारा देश अशी झाली आहे. मात्र हा देश अनेक नितांत सुंदर पर्यटनस्थळांनी परिपूर्ण असल्याची माहिती खूपच थोड्या लोकांना आहे. भारत पाक सीमेवरील तणाव हा नेहमीच धगधगता मुद्दा असला तरी आजही अनेक पाकिस्तानी भारतात पर्यटनासाठी येतात तसेच अनेक भारतीयही पाकमध्ये पर्यटनासाठी जात असतात.

## मे, जूनमध्ये जाणे उत्तम

या ठिकाणी जाण्यासाठी बाकी सोपस्कार करण्यापूर्वी हे लक्षात ठेवावे की मे जून हा येथे जाण्यासाठीचा सर्वात चांगला काळ आहे. थंडीत हे सरोवर बर्फाने गोठलेले असते त्यामुळे चहूबाजूला बर्फाशिवाय कांही दिसत नाही हे लक्षात ठेवून आपले प्रवासाचे शेड्यूल ठरवावे.

पाकिस्तानच्या खैबर जिल्ह्यातील सैफ उल मलूक सरोवर हे असेच भारतीय पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ आहे. पर्शियन युवराज सैफ उल मलूक यांच्या आठवणीत रमलेले हे स्थळ येथील अतिरम्य सरोवरासाठी आणि नितांतसुंदर निसर्गासाठी प्रसिद्ध आहे. या सरोवरात मिळणारे ब्राऊन ट्राऊट मासेही अतिशय प्रसिद्ध आहेत. सात किलो वजनाचे हे मासे पर्यटकांसाठी खास आकर्षण आहेत. आपल्या नंदनवनाची म्हणजे काश्मीरची आठवण करून देतील असे निळे बर्फाचे डोंगर, दूरवर पसरलेली हिरवाई, नितळ पाणी आणि स्वच्छ ताजी हवा तसेच मनाला निववणारी शांतता ही येथली खास वैशिष्ठये.





# आखाती देशातील ओमान

आखाती देशांकडे अनेकदा वेगळ्या नजरेने बघितले जाते. मग ते दुबईसारख्या देशातील सर्व सुविधांनी युक्त जीवनशैली असो किंवा सौदी अरेबियाचे प्रचंड वाळवंट. परंतु येथील ओमान हे एक विशेष स्थान लक्ष वेधून घेते ते त्याच्या अद्वितीय भूप्रदेश आणि संस्कृतीमुळेच. तुम्ही निश्चितपणे ओमानच्या प्रवासाची योजना का करावी हे जाणून घ्या...



## फ्रॅन्किसेन्स रोड

प्राचीन फ्रॅन्किसेन्स रोडवर सलालाहची घरे आहेत. शहराच्या कारावान मार्गावर या घरांची सुधारणा केली आहे. हे स्थान येथे आढळणाऱ्या सुवासिक राळसाठी प्रसिद्ध आहे. फ्रॅन्किसेन्स लॅण्ड संग्रहालयाला भेट द्या. जी ओमनच्या तेजस्वी आणि रंगीत इतिहासाला उज ळा देते. फ्रॅन्किसेन्सची झाडेही आपण येथे पाहू शकतो. येथे या स्फटीकांची चांगल्या दरामध्ये विक्री होते. शबा राणीच्या काळात याच्या विक्रीला सुरुवात केली होती.

## वाडीमध्ये क्षणभर विश्रांती

मस्कट-सूर महामार्गावर मध्य-पूर्वमध्ये एक नयनरम्य ड्राइव्ह आहे. अरेबिया गोड्या पाण्यातील तलाव आहे. हा जलस्त्रोत वाडीज म्हणून ओळखला जातो. ही उष्णता कमी करण्याची उत्तम जागा आहे. वाडीला सहसा वाळवंटात वाळूचा खडक व्यापलेला आहे. त्याच्या भव्य भिंती करून तलावाला घेरले जाते. मात्र ओमन वेशभूषांबाबतीत पुराणमतवादी आहे. यामुळे सभ्यतेबाबत कठोर मार्गदर्शक तत्वांची खात्री करून घ्या.

## रस-अल-जिंझ कासव केंद्र

रस-अल-जिंझ कासव केंद्रामध्ये ऑलिव्ह रिडले समुद्रातले आणि हिरव्या समुद्रातले दुर्मिळ प्रजातीचे कासव आढळण्याची उत्तम जागा आहे. टूर मार्गदर्शक आपल्याला प्राण्यांबद्दल माहिती देतो. तुम्ही रात्री उशिराची टूर घेतली तर वॉडलिंगसारखे वाळूमध्ये चटकन न आढळणारा प्राणी पाहू शकता.

# निसर्ग सौंदर्याने नटलेले अंदमान

बंगालच्या उपसागरात असलेली अंदमान आणि निकोबार ही बेटे भारताच्या मुख्य भूमीपासून दूर आहेत. या बेटांना आगळ्या-वेगळ्या संस्कृतीचे आणि अनोख्या निसर्ग सौंदर्याचे वलय लाभले आहे. सहलीला गेल्यावर नक्की पाहावा असा हा द्वीपसमूह आहे.


## नीरव शांततेसाठी

तुम्ही एखाद्या शांत जागेचा शोध घेत असाल तर अंदमान बेट एक उत्तम पर्याय आहे. उष्ण कटिबंधीय प्रदेशातील बंगालच्या खाडीजवळ हे बेट आहे पांढरे शुभ्र समुद्रकिनारे आणि हिरवेगार दाट जंगल हे अंदमानचे वैशिष्ट्य. निरनिराळे प्रकारचे प्राणी आणि वनस्पती यांच्या संचाराने या बेटाची शोभा अजूनच वाढते. साहसप्रेमी पर्यटकांसाठी स्कुबा ड्रायव्हींग, स्नॉरकेलिंग आणि मासे पकडण्यासाठी अंदमानचे समुद्र म्हणजे पर्वणीच.

उष्ण कटिबंधीय वनांनी युक्त घनदाट जंगले आणि लांबच लांब वाळूचे समुद्रतट असलेल्या प्रसिद्ध हॅवलॉक बेटाचा दौरा तर प्रत्येक पर्यटकाने करावा असाच आहे. हॅवलॉक, विजयनगर, राधानगर आणि एलिफंट समुद्रतट म्हणून प्रसिद्ध आहे. येथे तुम्ही स्कुबा डायविंग, स्नोर्कलिंग आणि मासेमारी करू शकता.

अंदमानची राजधानी पोर्ट ब्लेअर येथे एक ब्रिटीशकालीन ऐतिहासिक तुरुंग आजही भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या आहूतीची साक्ष देत उभे आहे. आता त्याचे रुपांतर एका स्मारकात करण्यात आले आहे. निसर्गसंपन्नता आणि ऐतिहासिक वारसा या दोन्ही गोष्टी जर सोबतच अनुभवायच्या असतील तर याला भेट देणे योग्य ठरेल.

# मन:शांतीची अनुभूती देणारी चामरलेणी



म्हसरूळ (नाशिक) येथील चामरलेणी (गजपंथ) जैनधर्मीयांचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. देशभरातून भाविक व पर्यटक या क्षेत्राला वर्षभर भेट देतात. त्यावर एक दृष्टिक्षेप... म्हसरूळ येथील चामरलेणी (गजपंथ) हे दिगंबर जैन पंथीयांचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. ही लेणी केवळ ऐतिहासिक वा धार्मिकच नव्हे, तर अनोख्या निसर्गसौंदर्याचं शांतीसह अनुभूती देणारे सिद्धक्षेत्र बनले आहे. भाविक दूरवरून येथे येऊन आपले दोष, राग-द्वेष, वासना, अहंकार या सर्वांचाच या शांतिस्थळावर त्याग करतात. येथे प्रत्येक ऋतूत भाविकांची वर्दळ असते.

## शुभ्र लेण्यांचे दर्शन

म्हसरूळ गावापासून 4 किलोमीटरवरील निसर्गसौंदर्याने नटलेला पर्वत पांढऱ्या शुभ्र लेण्याला छातीवर घेऊन उभा असतो. हे दृश्य पाहून भाविक या पर्वताच्या प्रेमातच पडतो. उल्हसित मनाने वाटचाल करतो या शांतिस्थळाकडे. अशा उत्साहपूर्ण वातावरणात भाविकासमोर या पर्वताच्या पायथ्याशी असेलेले मंदिर येते. त्याच्या छोट्या गाभाऱ्यांत चारही दिशांना श्वेतवर्णाच्या पद्मासनातील मूर्ती आहेत. तेथेच दोन फूट उंचीची पार्श्वनाथांची श्वेतवर्ण पद्मासन प्रतिमा आहे. जवळच क्षेमेंद्रकीर्तींची समाधी आहे. या मंदिरातून बाहेर पडताच पर्वतावरील लेणी खुणावत असतात. हिरव्या रंगाचे प्रदर्शन करणारा हा पर्वत काळ्याशार दगडांची वाट अंगभर घेऊन छातीवरील लेण्यात येण्याचे जणू आव्हानच देत असतो.

## श्वेतवर्ण चरण

सृष्टीसौंदर्य न्याहळत सुमारे 435 पायऱ्या चढून जेव्हा यात्रेकरू या पर्वतावरील गुंफांत प्रवेश करतो तेव्हा त्याला प्रथम जाणवते ती विलक्षण निरव शांतता. सुरुवातीला उजव्या हाताला छोट्या शिखराखाली तीन श्वेतवर्ण चरण आहेत. ते सुदर्शन, नंदी आणि नंदीमित्र या बलभद्रांचे आहेत. शिखरावर सुव्रत, सुधर्म, गजकुमार, अचल आणि विजय या बलभद्रांचे चरण आहेत. त्यांच्याजवळच नव्यानेच उभारलेली दोन मंदिरे आहेत. एका गुंफेत भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा आहे. ती उत्खननात मिळाली आहे. ती पूर्ण आणि अत्यंत मनोहरी श्यामवर्णीय मूर्ती नजर खिळवून ठेवते. ती दहा फूट चार इंच उंचीची पद्मासन प्रतिमा आहे. चारित्र्य चक्रवर्ती आचार्य शांतिसागरजींच्या मार्गदर्शनाखाली तिची स्थापना केली आहे.

## प्राचीन गुफा

मार्गशीर्ष शुक्ल 10, संवत 1664 मधील ही घटना आहे. दुसरे मंदिर वीर संवत 2460 मध्ये उभारले. उजव्या बाजूला एक फूट पाच इंच उंचीची कत्थई वर्णाची भगवान पद्मप्रभू यांची, तर डाव्या बाजूला भगवान वासुपूज्य यांची प्रतिमा आहे. या प्रतिमांशेजारीच तीर्थस्थळांवरील शांततेची अनोखी अनुभूती देणाऱ्या दोन प्राचीन गुंफा आहेत. त्या भाविकांना वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. स्वत्व विसरायला लावतात. या गुफांचा इतिहास ज्ञात नाही. प्रतिमांना लेप लावलेला आहे. त्यामुळे त्यांची निर्मिती कोणत्या काळात झालेली आहे, याचे अनुमान निघत नाही. समोर वेदीवर एक शिलाफलकात तीन श्यामवर्णीय,चार फूट पाच इंच उंचीच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. प्रत्येक प्रतिमांच्या दोन्ही बाजूला स्तंभ आहेत. त्यावर सर्वांत वर पद्मासन, मध्ये जंजीर आणि खालच्या बाजूला खड्गासन प्रतिमा अंकित आहेत. प्रतिमांवर छत्र असून, त्याच्या दोन्ही बाजूंना तूर्यवाद्ये आहेत. या छत्रावर एका हातात चामर, तर दुसऱ्या हातात फळे घेतलेली देवी, तसेच त्याच्याहीवर किचक आहे. बाजूलाच भक्त हात जोडून बसला आहे. या गुंफांत पद्मासन आणि खड्गासनस्थ मूर्ती आहेत. या गुंफेतील बाहेरच्या कक्षात भिंतीतच साडेसहा

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)




# ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते बीड येथे श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रेस प्रारंभ

## जय श्रीरामचा मोठा जयघोष | विविध ठिकाणी भेटी | मुस्लिम बांधवांना दिल्या ईदच्या शुभेच्छा

**बीड |प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज शहरात आरतीने श्रीराम जन्मोत्सव मिरवणूकीस प्रारंभ झाला. वाजत-गाजत, मोठया हर्षोल्हासात ही मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गावरून काढण्यात आली. ना. पंकजाताईंनी आज विविध ठिकाणी सांत्वनपर भेटी दिल्या तसेच मुस्लिम बांधवाना ईदच्याही शुभेच्छा दिल्या.

ना. पंकजाताई मुंडे यांचे दुपारी शहरात आगमन झाले.भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे माजी प्रदेशाध्यक्ष दिवंगत एजाज भाई देशमुख यांच्या शोकसभेस उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली. एजाजभाई हे मुंडे साहेबांचे अत्यंत लाडके कार्यकर्ते होते. अल्पसंख्यांक आघाडीच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या वाढीसाठी त्यांनी अविस्मरणीय योगदान दिले. अत्यंत शांत आणि सतत चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवणारे तळमळीचे कार्यकर्ते अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या जाण्याने आपण मुंडे साहेबांच्या शिकवणीवर चालणारा सक्रिय कार्यकर्ता गमावला आहे अशा शब्दात एजाजभाई देशमुख यांना श्रध्दांजली वाहिली.

याप्रसंगी भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे राष्ट्रीय नेते जमाल सिद्दीकी, आ. संजय केणेकर, डॉ. योगेश क्षीरसागर, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, इद्रीस मुलतानी,सलीम जहांगीर, उमेर सलीम, कल्याण आखाडे, काझी मकदूम यांच्यासह विविध पक्षातील मान्यवर उपस्थित होते.

### श्रीराम जन्मोत्सव मिरवणूकीचा आरतीने प्रारंभ


श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीला कंकालेश्वर मंदिर येथे ना. पंकजाताईंच्या हस्ते आरती करून सुरवात करण्यात आली. आरती नंतर मिरवणूक वाजत-गाजत, मोठया जल्लोषात शहरातून निघाली.

### विविध भेटी ; मुस्लिम बांधवांना दिल्या शुभेच्छा

ना. पंकजाताईंनी दैनिक रिपोर्टर चे संपादक शेख तय्यब, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या घरी सांत्वनपर भेट दिली. भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष इर्शाद भाई यांनी आयोजित केलेल्या ईद मिलापला भेट देऊन मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. या दौऱ्यात जिल्ह्यातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश; सिरसाळा येथील घरकुल धारकांचे थकीत हप्ते खात्यावर जमा!



**सिरसाळा/ अतुल बडे**

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर होऊनही गेल्या अनेक दिवसांपासून हप्ते रखडल्यामुळे अडचणीत सापडलेल्या सिरसाळा येथील लाभार्थ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. राज्याचे कृषीमंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे हे थकीत हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत. याबद्दल सरपंच सोहेल पठाण व ग्रामस्थांनी मुंडे साहेबांचे आभार मानले आहेत.

सविस्तर माहीती अशी की,सिरसाळा येथील अनेक गोरगरीब लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले होते. घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांनी कामाला सुरुवात केली, मात्र मधल्या काळात शासनाकडून मिळणारे हप्ते अचानक रखडले. घराचे बांधकाम अर्धवट राहू नये यासाठी अनेक लाभार्थ्यांनी खासगी सावकारांकडून किंवा ओळखीच्या लोकांकडून व्याजाने पैसे काढून घराचे काम पूर्ण केले होते. मात्र, हप्ते मिळत नसल्याने घेतलेले पैसे परत कसे करायचे, या विवंचनेत लाभार्थी होते. लाभार्थ्यांनी आपली ही व्यथा ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांसमोर मांडली. तत्कालीन सरपंच प्रतिनिधी फिरोज पठाण,

माजी सरपंच अक्रम खान पठाण,ग्रा.प. सदस्य शेख नदीम भाई,

ग्रा.प. सदस्य नेहाल भाई मणियार, यांनी तातडीने हा प्रश्न आमदार धनंजय मुंडे यांच्या कानावर घातला.धनंजय मुंडे यांनी संबंधित विभागाकडे तात्काळ पाठपुरावा करून तांत्रिक अडचणी दूर केल्या आणि रखडलेले हप्ते त्वरित वितरित करण्याचे आदेश दिले.

लाभार्थ्यांनी व्यक्त केला आनंद हप्ते जमा झाल्यामुळे आता लाभार्थ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. रखडलेले हप्ते मिळाल्याने व्याजाचे पैसे परत करणे शक्य झाले असून, हक्काचे घर पूर्ण होत असल्याचा आनंद लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे.



**"आमदार धनंजय मुंडे साहेब नेहमीच सामान्यांच्या प्रश्नावर तत्पर असतात. सिरसाळ्यातील घरकुल धारकांचे प्रश्न त्यांनी गांभीर्याने सोडवले, त्याबद्दल आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतो."**
**— सोहेल पठाण, सरपंच, सिरसाळा**

## प्रगत माझा वर्ग अभियान, एक पायलट प्रोजेक्ट !

# शिराळा तालुक्यातील नाठवडे, कोकरूड, रिळे, प.त. शिराळा केंद्रातील शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग

सांगली जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पाढे पाठांतर आणि इंग्रजी शब्द पाठांतर हा महत्वकांक्षी प्रकल्प शिराळा पंचायत समितीचे उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी बाजीराव देशमुख यांच्या संकाल्पनेतून आकारास आला आहे.

जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या इयत्ता पहिलीपासून सातवीपर्यंतच्या विद्याथ्यांसाठी हा उपक्रम राबवला जात आहे. दरवर्षी शाळा सुरू झाल्यावर जूनमध्ये या चार केंद्रातील सर्व शिक्षकांची कार्यशाळा घेऊन बाजीराव देशमुख त्यांना उपक्रमाची दिशा देतात. प्रत्येक केंद्राचे केंद्रप्रमुख आणि सर्व शिक्षक हे अभियान यशस्वी करण्यासाठी वर्षभर सातत्याने कार्यरत राहतात. प्रत्येक वर्ग स्तरावर पाढे आणि इंग्रजी क्रियात्मक शब्द पाठांतराचा सातत्याने सराव घेतात.

ग्रामीण भागातील विद्याध्यर्थ्यांना पाठांतराची सवय लागावी, शिक्षणामध्ये विद्याथ्यांचा आत्मविश्वास वाढावा, त्यांना अभ्यासाची गोडी लागावी, गणित आणि इंग्रजी या अवघड वाटणाऱ्या विषयांमध्ये त्यांची आवड निर्माण व्हावी अशा अनेक उद्देशाने प्रगत माझा वर्ग अभियान हा उपक्रम बाजीराव देशमुख २०१८ पासून नाठवडे, कोकरूड, प.त शिराळा, रिळे या केंद्रात राबवत आहेत.

प्रगत माझा वर्ग या प्रकल्यांतर्गत पाढे पाठांतर आणि इंग्रजी शब्द पाठांतर हा उपक्रम २०१८ पासून या चार केंद्रात ते ताकदीने राबवला जात आहे. आतापर्यंत या केंद्रांतील हजारों विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेतला असून इयत्तेच्या काठीण्य पातळीनुसार उच्चांकी पाढे आणि इंग्रजी शब्द विद्यार्थ्यांनी पाठ केले आहेत. पाठांतरामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

दीपावली सुट्टीनंतर प्रत्येक शाळेत पाढे पाठांतर आणि इंग्रजी शब्द पाठांतराच्या स्पर्धा पार पडतात,




शाळा स्तरावरील या स्पर्धेतून प्रत्येक वर्गातील दोन विद्याच्यांची निवड केंद्रस्तरीय स्पर्धेसाठी केली जाते. केंद्रस्तरावर या स्पर्धा होतात आणि प्रत्येक वर्षात तीन-तीन नंबर काढले जातात

कोरोना महामारीच्या काळात सुद्धा या प्रकल्पामध्ये खंड पडला नव्हता. या काळात ऑनलाईन पद्धतीने या स्पर्धा शाळा आणि केद्रस्तरावरही यशस्वीपणं घेतल्या होत्या. या माध्यमातून त्यांचे शेकडो इंग्रजी शब्द आणि उच्चांकी पाढे मुखोद्गत होत आहेत.

शिराळा तालुक्यातील हा डॉगराळ आणि दुर्गम भाग ! २०१८ पासून बाजीराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पाठांतराचा आवाका वाढला आहे. पाठांतराचे कौशल्य विद्याथ्यांना सर्वच विषयात अभ्यासासाठी उपयुक्त ठरत आहे. हेच या उपक्रमाचे फलित आहे.

गेली नऊ वर्षे सातत्याने हा उपक्रम राबवला जात असून, या उपक्रमाचा आवाका दिवसो दिवस वाढतच आहे. विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा प्रचंड प्रतिसाद या उपक्रमास मिळत आहे. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी दरवर्षी सर्व केंद्रातील पाढे आणि इंग्रजी शब्द पाठांतर स्पर्वेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र आणि शिल्ड देऊन विशेष समारंभात सम्मानित करण्यात येते.

याचबरोबर या चार केंद्रामध्ये प्रगत माझा वर्गच्या माध्यमातून प्रत्येक इयत्तेचा आदर्श, उपक्रमशील आणि सर्वांगीण गुणवतेला गती देणारा एक वर्ग प्रत्येक केंद्रातून निवडला जात असून, संबंधित वर्ग शिक्षकास प्रशस्तीपत्र आणि शिल्ड देऊन सन्मानित केले जाते. वाळवा शिराळाचे प्रांत श्रीनिवास अर्जुन आणि तहसीलदार श्यामला खोत पाटील यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले आहे.



केंद्रप्रमुख रवींद्र लोंढे, अर्जुन कदम, है या उपक्रमासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. यापूर्वी निवृत केंद्रप्रमुख आलिशा मुलाणी, केंद्रप्रमुख हरिभाऊ घोडे यांनीही हा उपक्रम ताकदीने राबविला होता. जागर शिक्षणाचा प्रणेते दिपक रोकडे आणि दिलीपकुमार मोरे यांनीही या उपक्रमात मोठे योगदान दिले आहे.

आज दिनांक २७ मार्च २०२६ रोजी आमदार सत्यजित देशमुख, माजी मंत्री शिवाजीराव नाईक, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक, शिराळा पंचायत समितीचे नूतन सभापती सम्राटसिंह नाईक, उपसभापती सौ.मनीषा पाटील, गटविकास अधिकारी श्रीमती स्नेहल नौकुडकर, गटशिक्षणाधिकारी पोपटराव मलगुंडे यांच्या उपस्थितीत शिराळा येथे या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना सन्मानित केले जात आहे.

सुनील गुरव, संजय गुरव, प्रकाश सावंत जगन्नाथ कुलकर्णी, अनंत सपकाळ, शांताराम ताराळ, संजय रोकडे, बाबाजी बानकर, जगदीश दिंडे, सर्जेराव मोहिते हे शिक्षक उपक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहेत.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत, या शाळेतील विद्यार्थी गुणवत्ताधारक झाला पाहिजे. या दृष्टिकोनातून शिक्षण विस्तार अधिकारी बाजीराव देशमुख यांनी गुणवत्तेची आगळी वेगळी परंपरा या विभागात निर्माण केली आहे. आणि पुढील काळात विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी यांचा उपयोग निश्चितपणे प्रेरणादायी आहे, हे निश्रित !

### पाठांतरातील अग्रेसर विद्यार्थी!

शिराळे खुर्द येथील इयत्ता पहिलीतील आराध्या आनंदा सुरले या विद्यार्थिनीचे ४२ पर्यंत पाढे पाठ आहेत. अस्वलवाडी या शाळेत चा इयत्ता पहिलीतील हर्षदीप गणेश खोत या विद्यार्थ्याचे १२३ इंग्रजी शब्द पाठ आहेत. मंगरूळ शाळेतील इयत्ता चौथीच्या परी विजय कोपर्डेकर या विद्यार्थिनीचे ६१ पर्यंत पाढे पाठ आहेत. कोकरूड शाळा नंबर १ मधील इयत्ता सातवीतील असद उस्मान मुलाणी या विद्यार्थ्यांचे ५० पर्यंत पाढे पाठ आहेत. कुसळवाडी येथील इयत्ता तिसरीतील विक्रमादित्य विकास पवार याचे ४६ पर्यंत पाढे पाठ आहेत. चिंचोली येथील इयत्ता सातवीतील देविका शिवाजी जाधव या विद्यार्थिनीचे २०० इंग्रजी शब्द पाठ आहेत.

**शब्दांकन :**
**दीपक रोकडे, सर जि. प. शाळा**
**काळमवाडी सांगली ९७६७६५२२२४**

-------------

# गोदावरी नदीतून अवैध वाळूचा 'नंगा नाच'; सिरसाळा परिसरात माफियांची मुजोरी शिगेला!




**सिरसाळा - अतुल बडे**

गोदावरी नदीच्या पात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाने सध्या गंभीर रूप धारण केले असून पोहणेर, तेलसमुख आणि डिग्रस परिसरात वाळूमाफियांचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या बेकायदेशीर कारभारामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या भागात दररोज शेकडो ब्रास वाळूचा उपसा केला जात आहे. ट्रॅक्टर, हायवा आणि इतर जड वाहनांच्या माध्यमातून वाळूची खुलेआम वाहतूक केली जात असून,

### हे रॅकेट आता निर्भयपणे सुरू आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणात कारवाईची भीती नसल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. काही ग्रामस्थांनी याबाबत जाब विचारला असता, संबंधितांनी "आम्ही कुणाच्या बापाला घाबरत नाही, आमचं सगळीकडे सेटिंग आहे" अशी उघड दर्पोक्ती करत दहशतीचे वातावरण निर्माण केले. यामुळे या माफियांना नेमके कोणाचे संरक्षण आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

### पर्यावरणाला मोठा धोका-

नदीपात्रातून होत असलेल्या अतिरेक उपशामुळे ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. त्यामुळे नैसर्गिक प्रवाह बिघडण्याबरोबरच भूजल पातळीवरही गंभीर परिणाम होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. भविष्यात पाणीटंचाई आणि पर्यावरणीय असंतुलनाचा धोका अधिक वाढू शकतो.

### प्रशासनाचा वचक संपला?

महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने माफियांचा मुजोरपणा वाढत चालल्याचे दिसून येत आहे.

### तातडीच्या मागण्या: आता तरी जागे व्हा!

१. छापे टाका: पोहणेर, तेलसमुख आणि डिग्रस परिसरात महसूल विभागाने कागदी घोडे न नाचवता थेट धाडी टाकून गुन्हे दाखल करावेत.


२. CCTV ची पाळत: वाळू वाहतुकीच्या मुख्य नाक्यांवर सीसीटीव्ही बसवून या 'रात्रीच्या राजांचा' बंदोबस्त करावा.

३. वरिष्ठांचा हस्तक्षेप: जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी स्थानिक यंत्रणेवर विसंबून न राहता स्वतः या प्रकरणात लक्ष घालून भ्रष्ट साखळी मोडीत काढावी. सध्या सर्वांचे लक्ष प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले असून, साधनसंपत्तीची लूट थांबवण्यासाठी कठोर पावले उचलली जातील का, की पुन्हा एकदा डोळेझाक केली जाईल, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

- "आम्ही कुणाच्या बापाला भित नाही!" म्हणणाऱ्या माफियांना अभय कुणाचे? प्रशासनाचा वचक संपला की' तडजोडी?
- "आम्ही कुणाच्या बापाला भित नाही" म्हणणाऱ्या माफियांना अभय कुणाचे?
- हुजरेगिरी करून ठेकेदारी कशासाठी?
- 'आका'ची मर्जी राखून मिळवलेली कामे सामान्यांच्या जीवावर उठत आहेत.
- पर्यावरणाला मोठा धोका
- सिरसाळयात प्रशासनाचा वचक संपला?
- आकाची हुजरेगिरी करून मिळवतात सिरसाळा हे ठिकाण पण नेमके कशासाठी?
- हुजरेगिरी करून काम टाकण्यापेक्षा इज्जतीने काम करा, लोक सलाम करतील!
- हप्ते नसणाऱ्या वाहनांवर होते कारवाई (नामी शक्कल) नागरिकांत चर्चा

### ठळक मुद्दे

- पर्यावरणाचा कणा मोडला: बेसुमार उपशामुळे भूजल पातळी घटली; भविष्यात भीषण पाणीटंचाईचे संकट.
- सिरसाळ्यात कोणाचे राज्य?: महसूल आणि पोलीस
- प्रशासनाचा वचक संपल्याने माफियांचे फावले.
- हप्तेखोरीची 'नामी' शक्कल: केवळ 'हप्ते' न पोहोचणाऱ्या वाहनांवर कारवाई करून दाखवण्याचा दिखावा? नागरिकांचं चर्चा









# श्री अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीमय सांगता; काल्याचे कीर्तन उत्साहात संपन्न

**महागाव प्रतिनिधी**

महागाव येथील जुने हनुमान मंदिरात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सुरू झालेल्या श्री अखंड हरिनाम सप्ताहाची आज गुरुवार, दि. २६ रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. रामनवमी निमित्त आयोजित या सप्ताहात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताहाच्या समारोपप्रसंगी ह.भ.प. विष्णुदास महाराज वाशिमकर यांचे काल्याचे कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. त्यांच्या प्रभावी कीर्तनातून उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या कार्यक्रमाला महिला, बालगोपाल, पुरुष मंडळी तसेच भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या या सप्ताहात दररोज काकड आरती, कीर्तन व नित्य नियमांचे पालन करण्यात आले. महागावकरांनीही या धार्मिक सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला.

भक्ती, नामस्मरण आणि सामूहिक साधनेचा सुंदर संगम असलेल्या या सप्ताहाची सांगता भक्तांच्या समाधानाने आणि आनंदमय वातावरणात पार पडली.

# संभाजीनगरचे जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी : एक आदर्श व्यक्तिमत्व

आज महाराष्ट्रातील संभाजीनगर येथे कार्यरत असणारे जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी हे एक आदर्श व्यक्तिमत्व आहे. महाराष्ट्र शासनाने श्री दिलीप स्वामी यांनी राबविलेल्या तीन योजनांना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात राबविण्याचे आदेश दिलेले आहेत.इतके त्यांचे कार्य समाजाभिमुख आहे. 25 मार्च हा त्यांचा वाढदिवस. त्यानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला हा आढावा.

श्री दिलीप स्वामी यांची माझी भेट अमरावतीला झाली. ते त्यांचे मित्र श्री अविनाश हदगल व श्री संजय सरवदे हे तिघेही अमरावती येथे प्रोबेशनवर उपजिल्हाधिकारी म्हणून आले होते. अमरावतीच्या कांतानगर परिसरात ते तिघेही शासकीय निवासस्थानात राहत होते.

त्यांचा माझा परिचय झाला आणि परिचयाचे रूपांतर जिवलग मैत्रीमध्ये झाले . साहेब अमरावती नांदेड बुलढाणा सोलापूर आणि आता संभाजीनगर येथे बदलून गेले परंतु आमचा स्नेह दिवसेंदिवस वाढतच गेला आणि आज तो घट्ट मैत्रीमध्ये रूपांतरित झालेला आहे.

एक तत्पर तेजस्वी व तपस्वी अधिकारी म्हणून श्री दिलीप स्वामी यांचा उल्लेख करावा लागेल. जिथे जिथे त्यांनी उपजिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी अपर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी म्हणून काम केले त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या कार्यशैलीमुळे आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. तो इतका की महाराष्ट्र शासनाला त्याची दखल घेऊन त्यांचे उपक्रम सर्व जिल्ह्यात राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा लागला.



आमच्या डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीच्या अभ्यासिकेचे व ग्रंथालयाचे उद्घाटन श्री दिलीप स्वामी यांच्या हस्ते झाले. मिशन आयेच्या सर्वच उपक्रमामध्ये श्री दिलीप स्वामी आवर्जून उपस्थित राहायचे व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत राहायचे. कार्यक्रम लहान असो की मोठा अमरावतीला असताना दिलीप स्वामी आमच्या कार्यक्रमाला आले नाहीत असे कधी झाले नाही.

सोलापूरला जिल्हा परिषदेला मुख्य कार्यकारी अधिकारी असताना त्यांनी जिल्हा परिषद शाळांसाठी जो अभिनव उपक्रम राबविला त्या उपक्रमाची दखल महाराष्ट्र सरकारने घेतली व तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांनी असे उपक्रम महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये झाले पाहिजेत यासाठी पाठपुरावा केला.

अमरावतीला साहेब उपविभागीय अधिकारी होते. मे जून महिना असावा. मुलांचे जातीचे प्रमाणपत्र उत्पन्नाचे दाखले रहिवाशाचे दाखले या शैक्षणिक वर्षात द्यावे लागतात. दिलीप स्वामी साहेब स्वतः ते काम करीत होते. पण काम खूपच वाढले .तेव्हा त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली आणि एक सहकारी उपजिल्हाधिकारी देण्याची विनंती केली. अर्थातच जिल्हाधिकाऱ्यांनी ती मान्य केली. पण नवीन आलेले अधिकारी रोजचे काम रोज करीत नव्हते. त्यांना विलंब लागत होता. काही लोकांनी स्वामी साहेबांच्या हे लक्षात आणून दिले. शैक्षणिक वर्ष किती महत्त्वाचे असते याची जाणीव स्वामी साहेबांना होती त्यामुळे त्यांनी सर्वच दाखले स्वतःच्या सहीने देण्याचा सपाटा लावला. कधी कधी तर झोपायला वेळही अपुरा पडायचा. पण माझ्यामुळे माझ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी त्यांनी रात्रीचा दिवस केला.

श्री दिलीप स्वामी आणि अमरावती हे समीकरण आता कायम स्वरूपाचे झाले आहे. अमरावतीत असतांना त्यांचा मोठा मित्रांचा गोतावळा तयार झाला. अनेक संस्थांची त्यांचे नाते कायमचे जोडले गेले. त्यामुळे साहेब आता कुठेही असो .अमरावतीला गझल संमेलन असो साहित्य संमेलन असो की एखादा मोठा कार्यक्रम असो आम्ही त्यांना अमरावतीला बोलवल्याशिवाय राहत नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे साहेब आमचे निमंत्रण टाळतही नाहीत.

संभाजी नगरला जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात विविध अभिनव उपक्रम राबविणे सुरू केले. त्यांनी राबविलेल्या दोन उपक्रमांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली आणि हे उपक्रम महाराष्ट्रातील सर्व जिल्हा अधिकाऱ्यांनी त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यात राबवावे असे परिपत्रक काढले . एखाद्या जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या कार्याला महाराष्ट्र शासनाने तीन वेळा संपूर्ण महाराष्ट्रात उपक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सांगणे मला वाटते ही प्रशासनातील फार महत्त्वाची व नोंदणीय बाब आहे. साहेब तसे लातूर जिल्ह्यातील. परभणीच्या कृषी विद्यापीठातून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले व लगेचच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून उपजिल्हाधिकारी म्हणून अमरावती येथे रुजू झाले. आजपर्यंतची त्यांची कार्यकीर्द ही प्रत्येक ठिकाणी मैलाचा दगड ठरलेली आहे आणि भविष्यातही ठरणार आहे. या लेखांमध्ये सौ.वहिनी साहेबांचा उल्लेख केल्याशिवाय हा लेख पूर्ण करता येणार नाही. सौ वहिनीसाहेबांची खंबीर साथ त्यांना मिळाली म्हणून साहेब प्रशासकीय कामाला भरपूर वेळ देऊ शकले. घरची सगळी बाजू सौ वहिनीसाहेबांनी सांभाळली त्यामुळे साहेब प्रशासनामध्ये राज्यस्तरीय प्रगती करू शकले.

**प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे, संचालक शिन आयएएस अमरावती कॅम्प**